Pudhari June 24,2016

# पाण्याचे लेखापरीक्षण आवश्यक : डॉ. काकोडकर

मुंबई : प्रतिनिधी

राज्याला गेल्या काही वर्षापासून पाणीटंचाईला तोंड द्यावे लागत आहे. भविष्याचा विचार करता आपल्याकडील पाणीसाठ्याचे व्यवस्थित नियोजन केले पाहिजे. भूगर्भातील पाणीपातळी किती, पाऊस पडल्यावर भूगर्भाच्या पाणीपातळीत वाढ झाली का तसेच दरवर्षी किती पाणी जमिनीतून उपसले जाते तसेच पाण्याचे वर्गीकरण, पाण्याचा वापर, पुनर्वापर अशा पध्दतीने पाण्याचे सर्वांकष लेखापरिक्षण केले पाहिजे, तरच पाणीटंचाईचे संकट टाळता येईल, असे आवाहन ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी केले.

सोसायटी फॉर क्लीन एन्व्हायरमेन्ट (सोक्लीन) आणि ट्रान्स एशियन चेंबर ऑफ कॉमर्स एण्ड इंडस्ट्री यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक सभागृह, पाण्याचे लेखापरिक्षण : आज आणि उद्यासाठी या विषयावर एक दिवसीय जलपरिषद झाली. याचे उद्घाटन डॉ. काकोडकर यांच्या हस्ते झाले. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, महापौर स्नेहल आंबेकर, सभागृहनेत्या तृष्णा विश्वासराव, अतिरिक्त मनपा आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, सोक्लीनचे अध्यक्ष व जेष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. ए. डी. सावंत



आदी उपस्थित होते. शिक्षणतज्ज्ञ आणि राजस्थान विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. ए. डी. सावंत अध्यक्ष असलेल्या सोसायटी फॉर क्लीन एन्व्हायरमेन्ट (सोक्लीन) या संस्थेतर्फे ही परिषद झाली. महाराष्ट्रात प्रथमच अशा प्रकारची जलपरिषद भरविण्यात आली.

पाणी हा अमूल्य ठेवा आहे. त्याचे जतन करण्यासाठी त्याचे लेखापरिक्षण करणे महत्वाचे आहे. यातूनच आपण हा नैसर्गिक स्त्रोत किती वाया घालवितो आणि किती जतन करतो याची शास्त्रोक्त माहिती मिळू शकेल, असे मत उपस्थित सर्वच मान्यवरांनी व्यक्त केले.

पैशाचे लेखापरिक्षण होते मग पाण्याचे का नाही? असा सवाल व्यक्त करत लेखापरिक्षणातून उपलब्ध जलसाठ्याच्या वापराची वस्तुस्थिती सगळ्यांसमोर मांडणे या हेतुनेच या जलपरिषदेचे आयोजन करण्यात आले होते, असे प्रतिपादन डॉ. सावंत यांनी केले.